**नागपूर येथे गोंडवना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा प्रशिक्षण उपकेंद्राच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे यांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : - आसंप्र १०१९/प्र.क्र.२१/का.०५**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ जून, २०१९

<u>वाचा</u> :-

१. शासन निर्णय, आविवि क्र. टिआरआय-२०१४/प्र.क्र.६/का.५, दिनांक ४ मार्च, २०१४.
२. सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे पत्र क्रमांक आसंप्रस/संग्रहालय-५/संस/२०१८-१९/०६ दिनांक ५.१.२०१९
३. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे पत्र क्रमांक आसंप्रसं/संग्रहालय-का.५/गोंडवना /२०१८-१९/९६, दिनांक २७.३.२०१९

**<u>प्रस्तावना</u> :** -

नागपूर येथे गोंडवना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा प्रशिक्षण उपकेंद्राची स्थापना करण्याबाबत दिनांक २८.१२.२०१३ रोजी संस्थेच्या सुवर्ण महोत्सव सोहळयाच्या उदघाटन निमित्त झालेल्या कार्यक्रमाच्या वेळी महामहिम राष्ट्रपती महोदय यांचे हस्ते गोंडवना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा प्रशिक्षण उपकेंद्राचे कोनशिलाचे अनावरण करण्यात आलेले आहे. त्यावेळी संस्थेच्या उपकेंद्राच्या स्थापनेची घोषणा करण्यात आली होती.

२. नागपूर येथे आदिवासी सांस्कृतिक संग्रहालाय तथा प्रशिक्षण केंद्र उपकेंद्राची स्थापना करणेबाबत शासनाच्या संदर्भ क्रमांक १ वरील दिनांक ४ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे अधिनस्त सह आयुक्त, तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर कार्यालयास नागपूर येथे आदिवासी कला, संस्कृती व परंपरा दर्शविणारे संग्रहालय व सांस्कृतिक उपकेंद्र उभारण्यासाठी मौजे. सुराबर्डी, ता.जि. नागपूर येथील सर्व्हे नंबर ४१ मध्ये १० एकर जमीन जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेली आहे.

३. नागपूर येथे आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा प्रशिक्षण केंद्राच्या संरक्षण भिंत बांधकामाच्या रुपये २०३.८८ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त झाले आहे. उपरोक्त अंदाजपत्रक उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) नागपूर यांनी तयार केले असून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, चंद्रपूर आणि अधिक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नागपूर यांनी सांक्षाकित केले आहे. सदर बांधकामाचे अंदाजपत्रक सन २०१७-१८ च्या दरसुचीवर आधारित आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

नागपूर येथे आदिवासी कला, संस्कृती व परंपरा दर्शविणारे संग्रहालय उभारण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या जमिनीला संरक्षक भिंत बांधण्याच्या अंदाजपत्रकाची आदिवासी विकास विभागाच्या बांधकाम व्यवस्थापन कक्षाद्वारे तांत्रिक तपासणी करण्यात आली असून त्यांनी परिगणीत केल्याप्रमाणे खालील अटींच्या अधिन राहून  नागपूर येथे गोंडवना आदिवासी कला, संस्कृती व परंपरा दर्शविणारे संग्रहालय उभारण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या जमिनीला संरक्षक भिंत बांधण्यासाठी रु.१,८१,२१,५१७/- (अक्षरी रुपये- एक कोटी एक्याऐंशी लाख एकवीस हजार पाचशे सतरा मात्र) इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**अटी-**

(अ)  सदर कामाचे विस्तृत आराखडे व संकल्पचित्र तयार करुन सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन त्यास सक्षम प्राधिका-याची तांत्रिक मान्यता घ्यावी.

(ब)  ढोबळ स्वरुपात करण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक तयार करुनच काम हाती घ्यावे. तसेच जागेच्या आराखडयानुसार इतर बाबींचे अंदाजपत्रके तयार करावे.

(क) सदर कामाची आर्थिक मर्यादा ही प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेच्या मर्यादेत ठेवण्याची दक्षता घ्यावी.

(ड) विद्युत विषयक बाबींसाठी विद्युत विभागाच्या सक्षम प्राधिका-यांची सहमती प्राप्त करुन घ्यावी.

(इ ) अंदाजपत्रकात एकूण बांधकाम किंमतीवर १२% GST  कर जोडण्यात आलेला आहे. विस्तुत अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देणे आदी बाबनिहाय VAT ची तरतूद वजा करुन बाबनिहाय आवश्यक GST ची तरतूद जोडण्यात यावी. तथापि, शासनाने निर्गमित केलेल्या वस्तु व सेवा कर कायदयाच्या अनुषंगाने शासन निर्णय, परिपत्रक, सूचना इत्यादि आधारे कार्यवाही करावी.

(ई ) सदर कामासाठी सनियंत्रक अधिकारी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे हे राहतील.

२. वरीलप्रमाणे प्रदान करण्यांत आलेल्या प्रशासकीय मान्यतेची बाबनिहाय तरतुदी सोबत जोडण्यात आलेल्या Recapitulation Sheet मध्ये दर्शविण्यांत आल्या आहेत.

३. सदर प्रशासकीय मान्यता शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-१००८/प्र.क्र.७०/२००८ विनियम दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रस्तृत केलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-१, उपविभाग-५, अनुक्रमांक १ नियम क्र. १३४ मधील तरतूदी नुसार, तसेच शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्र.ससमा २०१०/प्र.क्र.४८ (भाग-१) /का-१४६१, दिनांक ११ जुन, २०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यांत आलेल्या वित्तीय अधिकाराचा वापर करुन प्रदान करण्यात येत आहे.

४. सदर कामासाठी येणारा खर्च गोंडवना सांस्कृतीक संग्रहालाय तथा प्रशिक्षण उपकेंद्रासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत लेखाशिर्षातून केंद्रशासनाकडील आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडे उपलब्ध असलेल्या निधीतून खर्च करण्यात यावा.

५. सदर कामाची सुरुवात सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासुन सुरु होत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०६१४१७४१२१७९२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish Vithalrao Kove

Digitally signed by Satish Vithalrao Kove
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e13b027a7b550970150cf7dc69d276db3b1a6ebe3f71610fb5e8ff55b1676c8a, serialNumber=ce18732734ba0742d7712775e8f0ad400558e8748375399762fd447c3e9ac1eb, cn=Satish Vithalrao Kove
Date: 2019.06.14 17:31:59 +05'30'

**( सतीश कोवे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
६. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
७. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
८. मुख्य अभियंता, बांधकाम व्यवस्थापन कक्ष, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर.
१०. जिल्हाधिकारी, नागपूर.
११. सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर.

१२. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.

१३. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर.

१४. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नागपूर.

१५. उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी),उप विभाग, नागपूर.

१६. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम ( आदिवासी ) विभाग, चंद्रपूर.

१७. अवर सचिव/कक्ष अधिकारी (का.०६/का.१९), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१८. निवड नस्ती (का.०५), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

**Name of work: Construction of Compound Wall for Proposed Gondwana Tribal Museum And Training Sub Center at Surabardi Tahsil:- Nagpur (Rural) Dist.Nagpur.**

**RECAPUTULATION SHEET(For Administrative Approval)**

| | | |
|---|---|---|
| A) | **Cost of Compund Wall** | |
| | construction of Compound Wall | 14792419.00 |
| | A) | **14792419.00** |
| B) | Land Development | 500000.00 |
| | | **15292419.00** |
| c) | Add 4% for contigencies Charges | 611696.76 |
| G) | Add 1% for insurance charges | 152924.19 |
| H) | Add 1.5% for quality control & testing charges | 229386.29 |
| I) | Add for GST @12% on total construction cost | 1835090.28 |
| | **Total** | **18121516.52** |

CHIEF ENGINEER,
WORK MANAGEMENT CELL,
TRIBAL DEVELOPMENT DEPT.,
MANTRALAYA, MUMBAI-32

प्रशासकीय मान्यता मिळालेल्या शा. नि. चा
क्र.: आसंप्र १०१८/प्र.क्र २१/का.५
दि. १३/०६/२०१८.
रू. १८१.२१ लक्ष करिता

का. अ.
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय